# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा

**अर्थसंकल्पीय मा. स्थायी समिती सभा दि. २७/२/२०१७ रोजी आयोजित केली होती. सदर सभा तहकूब होऊन ती दि. ३/३/२०१७ रोजी विचार विनिमय करुन शिफारस करणेसाठी पुन्हा बोलविण्यांत आली. सदर सभेचा ठराव.**

**ठराव क्र. ३२२** **दिनांक ३/०३/२०१७**

---

**प्रस्तावाचा विषय:-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ अन्वये वसई विरार शहर महानगरपालिकेचे वृक्षप्राधिकरण, कर्जनिधी व विशेष योजनेसह अ व क अंदाजपत्रकाचे सन २०१६-१७ चे सुधारित व सन २०१७-१८ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाज मा. स्थायी समितीने विचारात घेऊन निर्णय घेणे.

**प्रस्तावाचा मजकुर :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ मधील तरतुदीप्रमाणे सविस्तर विचार विमर्ष करुन मा. स्थायी समितीने सन २०१६-१७ च्या सुधारीत अर्थसंकल्पासह सन २०१७-१८ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करणेसाठी, पी बजेट चे अंदाज, जेंण्डर बेटचे अंदाज व अंध अपंग कल्याण योजनांचे अंदाज यासह सर्वसाधारण अ अर्थसंकल्प, जल मल प्रवाह निधी क अर्थसंकल्प, वृक्ष प्राधिकारण अर्थसंकल्प, कर्ज निधी अर्थसंकल्प, सॅटेलाईट सिटी/ अमृत योजना विशेष निधी योजना अर्थसंकल्प याबाबत आयुक्त यांनी सादर केलेली तपशिलवार माहिती, अंदाज व प्रस्ताव विचारात घेण्यास शिफारस केली आहे.

**निर्णय :-** पी बजेट, जेण्डर बजेट व अंध अपंग कल्याणाचे बजेटसह सर्वसाधारण अ अर्थसंकल्प, जल मल प्रवाह निधी क अर्थसंकल्प, वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्प, कर्ज निधी अर्थसंकल्प, सॅटेलाईट सिटी/ अमृत योजना / विशेष निधी योजना अर्थसंकल्प याबाबतचे सन २०१६-१७ चे सुधारीत अंदाज व सन २०१७-१८ चा मुळ अंदाज तयार करताना मा. स्थायी समितीने दि. २७/०२/२०१७ ते दि. ३/०३/२०१७ या कालावधीत सविस्तर चर्चा व विचार विमर्ष करुन खालीलप्रमाणे फेरबदलासह शिफारशी केल्या आहेत.

१ प्रस्तावाचे वाचन करतांना अर्थसंकल्पातील मुद्रणदोष दुरुस्त करण्यांत आले.

२ मनपा क्षेत्रातील ज्या मालमत्ताना कर आकारणी झालेली नाही अशा मालमत्तांना कर आकारणी करणे तसेच आगाऊ मलमत्ताकर भरणा करणे कामी व्यापक अशी प्रसिध्दी करणेस व त्या कामी ठोस उपाययोजना करणेचे निर्देश देणेत आले.

३ मनपा क्षेत्रात होणाऱ्या जाहिराती (होर्डीग, बॅनरर्स) संदर्भात जागा भाडे व जाहिरात कर आकारणी करुन वसुल करणेस निर्देश देणेत आले.

४ सिनेमा / प्रयोग व खेळावरील कर सन २०१७-१८ मधील तरतुद ५ लक्ष २० हजार ऐवजी १० लक्ष २० हजार करण्येत आली.

५ जाहिरात कर सन २०१७-१८ मधील तरतूद ३ कोटी ५० हजार ऐवजी १ कोटी ५० हजार करणेत आली.

६ घनकचरा व्यवस्थापन अस्वच्छता व उपद्रव, प्लॅस्टीक पिशव्या वापर/ प्रशासकिय शुल्क सन २०१७-१८ मधील तरतुद ५ लक्ष ऐवजी १० लक्ष करणेत आली

७ हस्तांतरणीय चटई क्षेत्र प्रिमीयम या लेखाशिर्षामीधल हस्तांतरणीय शब्द काढणे अशी सुचना दिलेली आहे.

८ व्यायाम शाळा फी सन २०१६-१७ या मधील तरतुद ०.०० ऐवजी ५ लक्ष करणेत आली. तसेच सन २०१७-१८ मधील तरतुद ०.०० ऐवजी ५ लक्ष करणेत आली.

९ जाहिरातीसाठी जागा भाडे सन २०१७-१८ मध्ये ३ कोटी ऐवजी ५ कोटी करणेत आली.

१० सामान्य प्रशासन द्विनोंद लेखा पध्दती अंमलबजावणी सन २०१७-१८ मधील तरतुद १ लक्ष ऐवजी ६० लक्ष करणेत आली.

११ स्थानिक संस्थाकर दावे खटले सन २०१६-१७ मधील तरतुद १ लक्ष ऐवजी ४ लक्ष व सन २०१७-१८ मधील तरतूद १ लक्ष ५० हजार ऐवजी १२ लक्ष ५० हजार करणेत आली.

१२ साफ सफाई व सोयी स्वच्छता वाहन व्यवस्थापन ठेका सन २०१७-१८ मधील तरतूद ०.०० ऐवजी २५ लक्ष करणेत आली.

१३ रुग्णालय औषधे खरेदी सन २०१७-१८ मधील तरतूद ८ कोटी ऐवजी ७ कोटी ५० लक्ष करणेत आली.

१४ वैद्यकिय अधिकारी / वैद्यकिय सेवा कंत्राटी पध्दतीने सन २०१७-१८ मधील तरतूद २० कोटी ऐवजी १८ कोटी करणेत आली.

१५ मॅटनिटी वार्ड आस्थापना सन २०१६-१७ मधील तरतूद ३५ लक्ष ५१ हजार ऐवजी ५२ लक्ष ५१ हजार करणेत आली. तसेच सन २०१७-१८ मधील तरतूद ०.०० ऐवजी ५५ लक्ष करणेत आली.

१६ कुटुंब नियोजन आस्थापना सन २०१६-१७ मधील तरतूद ४ लक्ष ६२ हजार ऐवजी ७ लक्ष ६२ हजार करणेत आली. तसेच सन २०१७-१८ मधील तरतूद ०.०० ऐवजी ८ लक्ष करणेत आली.

१७ रुग्णालय इतर साहित्य खरेदी सन २०१७-१८ मधील तरतूद ३ कोटी ऐवजी २ कोटी ५० हजार करणेत आली.

१८ रुग्णांकरिता कपडे, चादरी, ब्लँकेट खरेदी तसेच धुलाई व इस्त्री सन २०१७-१८ मध्यी १ कोटी ऐवजी ७५ लक्ष करणेत आली.

१९ देव देवतांच्या मुर्ती विसर्जन तराफे दुरुस्ती सन २०१७-१८ मधील तरतूद १ लक्ष ५० हजार ऐवजी ५ कोटी करणेत आली. तसेच सदर लेखार्शिषाचे नाव देव देवतांच्या मुर्ती विसर्जन तराफे दुरुस्ती/ कृत्रिम तलाव असे करण्यात आले.

२० समाज मंदिर दुरुस्ती सन २०१७-१८ मधील तरतूद १ लक्ष ५० हजार ऐवजी २५ लक्ष ५० हजार करण्यांत आली.

२१ रस्ते दुरुस्ती सन २०१७-१८ मधील तरतूद ४० कोटी ऐवजी ५० कोटी करणेत आली.

२२ इतर मालमत्तांची दुरुस्ती / रंगरंगोटी (बांधकाम) ५० लक्ष ऐवजी १ कोटी करणेत आली.

२३ रोडरोलर व जे.सी.बी.वाहन व्यवस्थापन ठेका सन २०१६-१७ मधील ६ लक्ष ८१ हजार ऐवजी १४ लक्ष ८१ हजार करणेत आली.

२४ फेरीवाला सर्वेक्षण सन २०१७-१८ मधील तरतूद ५ हजार ऐवजी ३५ लक्ष करणेत आली.

२५ रस्ता बांधकामे सन २०१७-१८ मधील तरतूद ८५ कोटी ऐवजी १०० कोटी करणेत आली.

२६ राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना अनुदानासह महानगरपालिका अंशदानातून तलाव सुशोभिकरण करणे सन २०१७-१८ मधील तरतूद ४० कोटी ऐवजी ५० कोटी करणेत आली.

२७ इतर दिवाबत्ती व्यवस्था सन २०१७-१८ मधील तरतूद २ कोटी ७५ लक्ष ऐवजी ४ कोटी ७५ लक्ष करणेत आली.

२८ विकास निधी अंतर्गत आवश्यक तेथे शित गृहासह बहुउद्देशिय मार्केट बांधकाम सन २०१७-१८ मधील तरतूद १० कोटी ऐवजी १५ कोटी करणेत आली.

२९ विकास निधी अंतर्गत सर्व धर्मीयांच्या नवीन दहन व दफनभूमीसाठी भुसंपादन व विकासासह अस्तित्वातील दहन व दफन भूमीचा विकास तसेच विद्युत गॅस दाहिनी व्यवस्था सन २०१७-१८ मधील तरतूद १० कोटी ऐवजी १५ कोटी करणेत आली.

३० संगणकीय व्यवस्थापन केंद्र सन २०१६-१७ मधील तरतूद १ कोटी ९६ लक्ष ६९ हजार ऐवजी १ कोटी ७५ लक्ष ६९ हजार करणेत आली.

३१ रुग्णालय जनित्र खरेदी सन २०१७-१८ मधील तरतूद २५ लक्ष ऐवजी १० लक्ष करणेत आली.

३२ टि.सी.एल. पावडर व ॲलम खरेदी सन २०१६-१७ मधील तरतूद १० लक्ष ऐवजी २३ लक्ष ७५ हजार करणेत आली.

३३ शहरांतर्गत योजना दुरुस्ती देखभाल सन २०१६-१७ मधील तरतूद १ कोटी १८ लक्ष ३७ हजार ऐवजी ३ कोटी १८ लक्ष ३७ हजार व सन २०१७-१८ मधील तरतूद १२ कोटी ऐवजी १५ कोटी करणेत आली.

३४ पाणी पुरवठा विद्युत देयके (शहरांतर्गत) सन २०१६-१७ मधील तरतूद ७१ लक्ष २० ऐवजी १ कोटी २६ लक्ष २० हजार करणेत आली.

३५ शहरांतर्गत पाणी पुरवठा योजनेसाठी विद्युत जनित्र /रोहीत्र खरेदी सन २०१६-१७ मधील तरतुद २० लक्ष ऐवजी ३० लक्ष करणेत आली.

३६ गटारे बांधणे सन २०१७-१८ मधील तरतूद २४ कोटी १९ लक्ष ऐवजी ४९ कोटी करणेत आली.

३७ गटारावर चेंबर्स बांधणे व चेंबर्स व्यवस्था सन २०१७-१८ मधील तरतूद १० कोटी ऐवजी १४ कोटी करणेत आली.

३८ शौचालय व मुतारी व्यवस्था सन २०१७-१८ मधील तरतूद १ कोटी २६ लक्ष ऐवजी ४ कोटी २६ लक्ष करणेत आली.

३९ सन २०१६-१७ अखेर हाती घेतलेल्या, पुर्ण झालेल्या परंतु प्रदाने न झालेल्या व अपुर्ण राहीलेल्या भविष्यात पुर्ण होणाऱ्या कामांच्या प्रदाने सन २०१७-१८ व त्यापुढील तरतुदीतून प्रथम प्राधान्याने भागऊन तद्नुसार पुढील वित्तीय वर्षाच्या तरतुदीचे नियोजन करणेस शिफारस करणेत आली.

४० विकास कामांसाठी निधीची कमतरता व आस्थापना खर्चाचे अनुज्ञेय मर्यादा विचारात घेऊन तद्नुसार उत्पन्न व खर्च नियंत्रीत करणेच्या दृष्ठीने ठोस प्रयत्न करणेस शिफारस करणेत आली.

४१ अर्थसंकल्पासोबत सादर केलेल्या सबसीडी अहवालासह इतर सहपत्र तसेच मा. स्थायी समितीने अंतीमत: मान्य करुन शिफारस केलेल्या लेखाशिर्षनिहाय तरतुदींचा तपशिल अर्थसंकल्पाच्या प्रतीत नमुद करणेत आला असून सदर अर्थसंकल्पाची प्रत हा या ठरावाचा भाग मानला जाईल.

उपरोग्त फेरफारासह मा. स्थायी समितीने तयार करुन मा. महासभेपुढे सादर करणेस शिफारस केलेल्या सन २०१६-१७ चे सुधारीत अर्थसंकल्प व सन २०१७-१८ चे मुळ पी बजेट, जेण्डर बजेट, अंध अपंग कल्याणाचे बजेटसह सर्वसाधारण अ अर्थसंकल्प, जल मल प्रवाह निधी क अर्थ संकप, वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्प, कर्ज निधी अर्थसंकल्प, सॅटेलाईट सिटी

योजना / अमृत योजना / विशेष निधी योजना अंदाजपत्रक या सर्वांचा एकत्रित अर्थसंकल्पीय गोषवारा खालील प्रमाणे आहे.

(रु. लाखात)

| लेखाशिर्ष | सुधारीत अर्थसंकल्प सन २०१६-१७ | मुळ अर्थसंकल्प सन २०१७-१८ |
|---|---|---|
| प्रारंभिक शिल्लक | ३६७२०.१५ | ३४३०७.०४ |
| जमा रकमा | १०६२३४.८६ | १५२४५३.२२ |
| **प्रारंभिक शिलकेसह एकूण जमा रकमा** | **१४२९५५.०१** | **१८६७६०.२६** |
| वर्ग जमा रकमा | १७०४८.०१ | १३९८६.०० |
| **खर्च रकमा** | **१०८६४७.९७** | **१७६२२९.६७** |
| वर्ग खर्च रकमा | १७०४८.०१ | १३९८६.०० |
| अखेर शिल्लक | ३४३०७.०४ | १०५३०.५९ |

**सुचकाचे नाव :- श्री. प्रशांत राऊत**

**व स्वाक्षरी :-**

**अनुमोदकाचे नाव :- श्री. वृंदेश (उमा) पाटील**

**स्वाक्षरी :-**

**अनुकुल संख्या :-** **प्रतिकुल संख्या :-** **तटस्थ संख्या :-**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**(नितीन राऊत)**
**सभापती तथा पिठासीन प्राधिकारी**
**स्थायी समिती**
**वसई विरार शहर महानगरपालिका**